आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in

संपर्क : 8208133993, 9890280263
वृत्तपत्र जगतातील एक सुवर्ण दालन, लवकरच आपल्या सेवेत....
मयुर प्रिंटर्स
B-28, MIDC, Latur.

साप्ताहिक असो वा दैनिक असो आकर्षक छपाई योग्य दरात.

दैनिक
# लातूर प्रभात
E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १८७ वा ● बुधवार दि. २५ डिसेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

प्रिंट ४ कार्ट
PRINT4KART



तुमचा लोगो लगेचच
प्रिंट करा
आणि पोहोचवा
प्रत्येका पर्यंत !
MO - 8329291031

## झरोका

एक – अहो, ते कोणते आंबेडकर आंबेडकर असा विषय चर्चेला जातो आहे, त्यामुळे अमित शहा हे सर्वत्र चर्चिले जात आहेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदो उदो असे तसे काय करतात, हेच कळत नाही. म्हणून बोलतो आहे, डोकं बधिर झाले.

दुसरा – अरे, हे चालबाजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ते भाजपा मार्गे अमित शहा यांनी आंबेडकर आंबेडकर ही फॅशन असेच संबोधिले त्यामध्ये त्यांचा स्वार्थ आहे, कारण उद्याला अमित शहा यांना पंतप्रधान व्हायचे आहे, त्यामुळे आज घडीला आंबेडकर, आंबेडकर म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, आरएसएस चे मोहन भागवत यांना उघडे पाडून स्वतःचा स्वार्थ पाहू शकतात ही त्यांची खेळीच असते तू कशाला अडगळीत पडतोस.

एक – अहो, असे कसे म्हणता येत नाही कारण असे की भारतीय राजकारण सत्ताकरणात हे सारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानुसारच चालते परंतु याच संविधानांना सर्वपक्षीय नेते लचके तोडत असतील तर त्यांची जाभाडे कोण उकडून टाकेल याचीच काळजी वाटते म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, कोणी कोणास काय बोलावे, लावली रताळे, आली केळे, लोकशाही संविधानाचे काय बोलतोस, शांत बस ना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचं वैचारिकत्व कोणी पैलू शकत नाही एवढेच.

## काय बोलता राव ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निमित्ताने जो काही गदारोळ होतो आहे, त्या संदर्भात काहीच कळत नाही, सर्वपक्षीय नेते एकत्र असताना भाजप आणि आरएसएस यांची कशी काय चलती होती आहे हेच कळत नाही म्हणून सर्व काही दृष्टीने विचार करत असताना डोकं सणसणत आहे, भारतीय राजकारण, सत्ताकरणार, लोकशाही संविधान जिवंत आहे की नाही, हेच कळत नाही.

**काय बोलता राव !**

अरे, भारतीय सत्ताकारण, राजकारणामध्ये संविधानाला अधिकचे महत्त्व असते परंतु गेल्या ७५ वर्षापासून भारतीय राजकारण सत्ताकरण्यात वैभवशाली परंपरा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय संविधानाच्या निमित्ताने आजवरचा घडा चालत असताना नेमके याच संधीचा फायदा घेऊन अमित शहा यांनी आंबेडकर, आंबेडकर असा उल्लेख करून जे काही वक्तव्य केले त्यास पांघरून घालून भाजपा सर्व मित्र पक्षांनी अमित शहा यांना सहकार्य केले परंतु आजवर विरोधी पक्षाने जे काही विधान केले होते, त्याची चित्रफित प्रसार माध्यमां समोर दाखल केली होती, परंतु आज घडीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने आंबेडकर ही फॅशन कोणाच्या आधारे कशी काय केली हे चित्रफित लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला किंवा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ती जाहीरपणे व्हायरल का करू नये अशीच चर्चा सर्वसामान्यातून होत असताना या संदर्भात प्रसार माध्यमे गप्प का असावी, मग बोला दाजीबा!

## गृहमंत्री अमित शहांचा राजीनामा घ्या-डॉ. हुलगेश चलवादी 'बसप'चे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन




पुणे : देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी संसदेत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर बहुजन समाज पार्टीने तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पुणे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करीत त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा अवमान गृहमंत्र्यांनी केला असून, त्यांच्या वक्तव्यामुळे बहुजन समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत, अशी भावना बसप प्रदेश महासचिव आणि पश्र्चिम महाराष्ट्र मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांनी मंगळवारी (ता.२४) केला.

निवेदन सादर करतांना प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुदीप गायकवाड,पुणे जिल्हाध्यक्ष दिलीप कुसळे,राजेंद्र गायकवाड, ॲड. सोनावणे, मो.शफी, बापूसाहेब कुदळे, महेश जगताप, अनिल त्रिपाठी, रमेश गायकवाड, पीआर गायकवाड, शीतल गायकवाड, अरुणअन्ना गायकवाड, डावरे, वानखेडे, प्रदीप ओहळयांच्या सह जिल्ह्यातील सर्व विधानसभा उमेदवार व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ बहुजन समाजाचेच नव्हे, तर संपूर्ण भारताचे महानायक आहेत.त्यांच्यावरील असे अपमानास्पद वक्तव्य सहन केले जाणार नाही, असे डॉ.चलवादी म्हणाले.बहुजन समाजाने समंजस्याची भूमिका घेतल्याने महाराष्ट्र पेटला नाही, ह विशेष. परंतु, समाजाच्या रोष केवळ शहा यांच्या राजीनाम्यानंतरच शांत होईल,असे डॉ.चलवादी म्हणाले.

देशातील दलित,वंचित ,शोषित, उपेक्षितांसह इतर मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी ग्रंथाची निर्मिती करणारे डॉ.बाबासाहेबांबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचे आक्षेपार्ह व्यक्तव्य देशवासियांच्या भावनांना दुखावणारे आहे.

अमित शहा यांच्यावर गुन्हा दाखल करून त्वरित कारवाई करण्याची मागणी बसपची असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले. दरम्यान, या प्रकरणावर देशभरात बहुजन समाजाने तीव्र निषेध व्यक्त करीत आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.शहांनी केलेल्या वक्तव्यासाठी देशवासियांची क्षमा मागावी तसेच शब्द परत घेत पश्र्चाताप करावा, अशी मागणी बसपाची आहे.

आंबेडकरी समाजाच्या मतांसाठी राजकारण करणारे काँग्रेस आणि भाजप एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. बाबासाहेबांच्या आत्म–सन्मानार्थ प्रयत्नांवर बाधा टाकण्याकरीता सर्वच पक्षाचे नेते बसपावर घाव घालणाऱ्या षंडयंत्रामध्ये सहभागी असल्याचा दावा डॉ. चलवादी यांनी केला.

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख व खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी बाळू डोंगरे कुटुंबीयांची भेट घेऊन दिला धीर

लातूर प्रतिनिधी : लातूर शहरातील आयकॉन या खासगी



हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या बाळू डोंगरे या कर्मचाऱ्याला अमानुषपणे मारहाण करून त्याचा खून केल्याची घटना उघड झाली आहे, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी मंगळवार २४ डिंसेबर २४ रोजी दुपारी डोंगरे यांच्या घरी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली, कुटुंबीयांचे सांत्वन करुन त्यांना धीर दिला.

लातूर शहरातील आयकॉन हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या बाळू डोंगरे यांच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. या हृदयद्रावक घटनेनंतर राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व खासदार डॉ. शिवाजी बंडाप्पा काळगे यांनी बाळू डोंगरे यांच्या निवासस्थानी गेले. या भेटीत त्यांनी वडील भारत डोंगरे, आई प्रेमा डोंगरे, पत्नी छाया डोंगरे डोंगरे कुटुंबीयांना धीर दिला. त्यांनी या घटनेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आणि या प्रकरणाचा कसून तपास करावा यासाठी आणि दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी पाठपूरावा करु अशी डोंगरे कुटुंबीयांना या भेटीदरम्यान ग्वाही दिली.

## उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्योग विभागाची आढावा बैठक संपन्न



पुणे, : उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधून उपाययोजना कराव्यात, असे निर्देश उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. रस्ते, वाहतूक कोंडी, पार्किंगचा प्रश्न्न सोडविण्यासह आवश्यक तेथे उद्योगांना जागा, पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

पिंपरी चिंचवड येथे उद्योग विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता नितीन वानखडे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य अभियंता अशोक भालकर, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक शैलेंद्र राजपूत, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिकारी अर्चना पाठारे, अधीक्षक अभियंता निलेश मोढवे आदींसह उद्योग संघटना, उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत हिंजवडी, पिंपरी चिंचवड, तळवडे आदी ठिकाणच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या हद्दीतील उद्योगांच्या समस्यांचा आढावा मंत्री श्री. सामंत यांनी यावेळी घेतला. ते म्हणाले, पीएमआरडीए च्या माण – म्हाळुंगे टी. पी. स्कीमला लवकरच मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळणार असल्याने हिंजवडीसाठी पर्यायी रस्त्याच्या कामाला गती मिळणार आहे.

ते पुढे म्हणाले, वाहतूक कोंडी होणाऱ्या चौकातील टपऱ्या पोलीस विभागाच्या सहकार्याने हटवाव्यात. उद्योगांनी त्यांच्याकडील वाहने रस्त्यावर थांबणार नाहीत याची काळजी घ्यावी. एमआयडीसीने दोन्ही महानगरपालिका तसेच पीएमआरडीएच्या हद्दीतील मोकळ्या जागा शोधून तेथे उद्योगांसाठी येणाऱ्या ट्रक आदी वाहनांचे पार्किंगसाठी प्रयत्न करावेत.

राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील रस्त्यातील खड्डे, दुभाजक, पदपथ आदींची देखभाल दुरुस्ती तातडीने करण्याच्या दृष्टीने प्रस्तावाचा पाठपुरावा करावा. सुविधांसाठी उद्योगांकडून घेण्यात येणारे सेवा शुल्क उद्योगांना परवडेल अशा पद्धतीने त्यांचेशी समन्वय साधून वाढविण्यात यावे, असेही ते यावेळी म्हणाले.

तळेगाव येथील फ्लोरीकल्चर पार्कमधील उद्योगांना वाटप केलेल्या भूखंडांबाबत वस्तुस्थिती तपासून घ्यावी. तसेच वाटप केलेले विनावापर भूखंड अन्य उद्योगांना देण्याबाबत विचार करण्यात येईल. तळवडे माहिती तंत्रज्ञान पार्क येथील उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी संरक्षण विभागाशी संपर्क साधण्याचे निर्देशही त्यांनी विभागाला दिले.

## माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांची अपशिंगे (मिलिटरी) गावाला भेट

सातारा : अपशिंगे (मिलिटरी) गावाला मोठी परंपरा आहे. पहिल्या महायुद्धात गावातील ४६ जवान शहीद झाले होते. आताही या गावातील प्रत्येक कुटुंबातील सदस्य सैन्यदलात कार्यरत असून देशाच्या सीमेचे रक्षण करीत आहेत. त्यांच्या या बलिदानामुळे आपण सुरक्षित जीवन जगत आहोत. या गावाच्या सर्वांगिण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही माजी सैनिक कल्याण, पर्यटन, खनिकर्म मंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी दिली. सातारा तालुक्यातील अपशिंगे (मिलिटरी) येथे आजी–माजी सैनिकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मंत्री श्री. देसाई बोलत होते. या प्रसंगी पोलीस अधीक्षक समीर शेख, प्रांताधिकारी सुधाकर भोसले, तहसीलदार नागेश गायकवाड, सैनिक कल्याण विभागाचे संचालक दिपक ठोंगे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सतीश हंगे, गावचे सरपंच तुषार निकम, माजी कॅप्टन आर.डी. निकम, शंकर माळवदे आदी उपस्थित होते.

माजी सैनिक कल्याण मंत्री श्री. देसाई म्हणाले, अपशिंगे (मिलिटरी) गावाला सैनिकी परंपरा आहे. या गावातील कुटुंबातील एकतरी व्यक्ती देशसेवा करीत आहेत. या गावातील माजी सैनिकांच्या शौर्याची माहिती बाहेरील लोकांना व्हावी यासाठी वॉर मेमोरियल तयार करण्यात येईल. यातून युवा पिढीला प्रेरणा मिळून देश सेवेसाठी सैन्यदलात जातील, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

## राष्ट्रपतींनी अमित शहांचा राजीनामा घ्यावा आमदार अमित देशमुख; दुचाकी रॅलीने जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन





लातूर : देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत संसदेत संतापजनक वक्तव्य केले. त्यांच्या वक्तव्याचा देशभरातून निषेध होत आहे. अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे, परंतु, केंद्र सरकार हुकूमशाही पद्धतीने वागत असून आता राष्ट्रपतींनीच या प्रकरणात हस्तक्षेप करुन अमित शहा यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबतीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ दि. २४ डिसेंबर २४ रोजी काँग्रेस पक्षाच्या वतीने माजी मंत्री आमदार अमित देशमुख व खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नेतृत्वात दुचाकी रॅली काढून जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर–घूगे यांना निवेदन देण्यात आले.

त्याप्रसंगी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख बोलत होते, येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून दुचाकी रॅलीस सुरुवात झाली. प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या विनंम्र अभिवादन केले, दुचाकी रॅली मेन रोडने लोकमान्य टिळक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, दयानंद गेट, संविधान चौक, एक नंबर चौक, पाच नंबर चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर पोचली. तेथे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर–घुगे यांना केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी राजीनामा द्यावा, या मागणीचे निवेदन दिले.

**पीडित कुटूंबियांना न्याय मिळत नाही तोपर्यंत लढा सुरुच राहणार**

परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी कुटूंबिय, मस्साजोग येथील देशमुख कुटूंबिय, लातूर येथील डोंगर कुटुंबियांना जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत काँग्रेसचा लढा सुरुच राहिल, असे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना म्हटले आहे. काँग्रेसचे नेते खासदार राहूल गांधी यांनी परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी कुटूंबियांची भेट घेतली. सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाची हत्या झालेली असताना राज्याचे मुख्यमंत्री मात्र वेगळीच भूमिका मांडत आहेत. त्यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात असून केंद्रीय यंत्रणेने यात लक्ष घालावे. मुख्यमंत्र्यांनी तातडीने कार्यवाही करुन सूर्यवंशी कुटूंबियांना, मस्साजोग येथील देशमुख आणि लातूरातील डोंगरे कुटुंबियांनाही न्या द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

या दुचाकी रॅलीत माजी आमदार वैजनाथराव शिंदे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड़ किरण जाधव, काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष ॲड़ बाबासाहेब गायकवाड, अल्पसंख्यांक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड़ फारुक शेख, माजी महापौर ॲड़ दीपक सुळ, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, प्रविण सूर्यवंशी, दगडुअप्पा मिटकरी, ॲड़ देविदास बोरुळे–पाटील, यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, सदस्य व नागरिक सहभागी झाले होते.

## ओ मोठ्या ताई, तुमचे जातीवाद, प्रांतवादाचे राजकारण महाराष्ट्र खपवून घेणार नाही; चित्रा वाघ यांचा सुप्रिया सुळेंवर पलटवार

बीड : बीडच्या मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या, तसेच परभणीत झालेला हिंसाचार व न्यायालयीन कोठडीत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या झालेल्या मृत्यूमुळे राज्यातील राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. यावरून राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी जोरदार हल्लाबोल केला. आजवर जे सिनेमात गुन्हेगारीचे चित्र पाहायला मिळायचे ते महाराष्ट्राला वास्तवात दिसू लागले आहे. या घटना महाराष्ट्राला शोभणाऱ्या नाहीत. आता पुढचा महाराष्ट्र कसा असेल अशी भीती मला वाटत असल्याचे त्यांनी म्हटले. यावरून भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी सुप्रिया सुळे यांच्यावर जोरदार पलटवार केलाय.

चित्रा वाघ 'एक्स'वर पोस्ट करत सुप्रिया सुळे यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी म्हटलेय की, ओ मोठ्या ताई... बीड परभणीमध्ये घडलेल्या घटना नक्कीच दुर्दैवी आहेत. पण, त्या घटनांची न्यायालयीन चौकशी होणार आहे. गुन्हेगारांना इथे माफी मिळत नाही की पाठीशी सुद्धा घातले जाते नाही. कारण दुर्दैवी घटना घडल्या की गुन्हेगाराला पाठीशी घालायचे हे तुमच्या वेळी सर्रास चालायचं. गोवारी हत्याकांड विसरलात का? गुन्हेगारांना पाठीशी **(पान ३ वर) ....**

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# मोदी, शहा यांचीच फॅशन!

## संपादकीय...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत, समता आणि न्याय आधारावरच समान हक्का नुसार महिला पुरुषांना हक्का नुसार हिंदू कोड बिल सादर केले होते. त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी नाकारल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला होता. तो स्वाभिमान, हक्क आणि न्यायाचा पुरस्कार करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपा धार्जीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि त्यांचे चमचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची फॅशन फॅशन म्हणून जे काही आज घडीला उच्चार चालले आहे ते धोकादायक असून त्यामुळे भारतीय लोकशाही आणि संविधानाला गळफास बसतो की काय अशी सर्वसामान्यातून प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा घटनाकार म्हणून हा मेसेज भाजपा,राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांचे चाहते डोक्यावर घेऊन नाचायचे आणि त्यांच्याच विचाराला चातुऱ्याने पायदळी तुडवायचे हीच आजची खरीच फॅशन असेल तर मग मोदी शहा यांनी जे काय वक्तव्य केले, त्यामुळे जी उलट्यापालट होत आहे, त्यानुसार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे मोदाड संस्कृतीनुसार मनुस्मृतीलाही पायदळी तुडवून स्वतःच अस्तित्व निर्माण करून भारतीय राजकारणात, श्रीरामाचा जयघोष करू शकत आहेत का, अशीच कुजबूज सर्वत्र होत असून, जय श्रीराम, जय भीम असा नारा, आज घडीला होतो आहे, त्यामुळे कोणते आंबेडकर हा विचार आकाश धरतीलाच पडला असावा अशी सर्वसामान्य जनतेतून विचारणा होत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असले तरी महिला व पुरुषांना समान हक्क देऊन सार्वभौमत होणे न्यायिक हक्काने स्वातंत्र्याचे बाबतीत बाबासाहेब आंबेडकर हे सर्वश्रेष्ठ आहेतच परंतु प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सांगण्यावरून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मोहन भागवत यांच्या सल्ल्यानुसार, अमित शहा यांनी जे काही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निमित्ताने जे काही विधान केले ते बुद्धिवंताला असो किंवा नसो सर्वसामान्य जनतेंना खटकले असून त्याचा परिणाम अवघड होणार असल्यामुळे त्या दृष्टीने आज घडीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे अमित शहा यांना सावरत असले तरी संसद भवन हादरल्याशिवाय राहणार नाही असेच कुजबूज सर्वसामान्यातून होताना दिसते आहे.

वास्तविक पाहता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमित शहा यांना जाब विचारून खुलासा करायला पाहिजेत होता, परंतु ज्या अमित शहा यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये कलगीतुरा करून भाजपाला आश्रय दिलाय, सत्ताकारण, राजकारण केले, तोच अमित शहा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर फॅशन म्हणून जो विषय निर्माण करून विश्र्ववल्ली केली त्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे सापळ्यातच अडकल्याचे दिसते आहे त्यामुळे लोकशाही संविधानाच्या मार्गातून मोकळे होण्यासाठी एक तर अमित शहा यांना बाजूला काढावे लागेल, नाहीतर नाक कापले तरी छिद्र आहे म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मोहन भागवत यांनी काळी रेषा ओढावी अशीच मागणी सर्वसामान्यातून होताना दिसते आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर आंबेडकर म्हणून जी खिल्ली उडवली ती वास्तवात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आरएसएस चे मोहन भागवत आणि अमित शहा यांनीच घटना बदलणार नाही आणि ते कोणीही बदलू शकत नाही असे म्हणून जे काय कुठकारस्थान केले ते सर्वसामान्यांना अवगत असतानाही हा कांगावा केल्यामुळे कोणते आंबेडकर हा विषय नरेंद्र मोदी मोहन भागवत अमित शहा यांना कसं काय कळत नसावा कारण असे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरा हा माणूस भारतीय राज्यघटनेचा शिल्पकार आहे तो सर्वसामान्य जनतेचा नायक आहे, महिला पुरुषांना समान हक्क देणारा आणि जागतिक स्तरावर समानतेचा संदेश देणारा तो एक बापाचा बाप आहे, हा विषय मोदी, शहा यांना कळत नसेल तर बापडी जनता काय करणार हा विचार नरेंद्र मोदी यांनी करावा आणि नासक्या कांद्याला अमित शहा यांना बाजूला फेकून द्यावे हीच अपेक्षा.

## महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या पुणे येथील ४० व्या संमेलन अध्यक्ष पदी प्राचार्य डॉ नागोराव कुंभार यांची निवड



लातूर. येथील महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य , स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता आणि वैचारिक साहित्याला वाहिलेल्या विचारशलाका या नियतकालिकाचे संपादक प्राचार्य डॉ नागोराव कुंभार यांची पुणे येथील एस पी महाविद्यालया मध्ये २६ , २७ आणि २८ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये संपन्न होणाऱ्या महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या चाळीसाव्या तीन दिवसीय संमेलना च्या अध्यक्ष पदी निवड झालेली आहे . या संमेलनाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी यांच्या शुभहस्ते होणार आहेशि तर समारोप उप कुलगुरू प्रा डॉ पराग काळकर यांच्या हस्ते होणार आहे.

प्राचार्य डॉक्टर नागोराव कुंभार यांनी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य मागास वर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य गॅजेटियर, महाराष्ट्र राज्य विश्र्वकोश निर्मिती मंडळ आणि तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश समिती आदी ठिकाणी सदस्य म्हणून कार्य केलेले आहे. त्यांनी आठ ग्रंथाचे लेखन व ५० ग्रंथाचे संपादन केलेले आहे. आता पर्यंतचे त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये २० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आत्तापर्यंत बारा संशोधक विद्यार्थ्यांना पीएच. डी व पाच विद्यार्थ्यांना एम फिल पदवी प्राप्त झालेली आहे. ते महाराष्ट्र शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार, फुले आंबेडकर साहित्य पुरस्कार, प्राचार्य टी एस कडगे आदर्श प्राचार्य पुरस्कार आणि महाराष्ट्र फाउंडेशन चा पन्नास हजार रुपयांचा पुरस्कार आदी २० ते पंचवीस पुरस्कारानी ते सन्मानित आहेत.

या अधिवेशनाची मध्यवर्ती संकल्पना महाराष्ट्रातील समकालीन तत्व चिंतन ही आहे. तसेच या अधिवेशनामध्ये प्राध्यापक मे पु रेगे यांचे समग्र तत्त्वज्ञान आणि नीतिमान समाज रचना संत विचार या दोन अत्यंत महत्त्वाच्या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आलेले आहेत तसेच या अधिवेशनात मध्ये डॉक्टर बी आर जोशी यांना घनश्याम दास सोनी जीवनगौरव पुरस्कार, प्राचार्य किरण सावे यांच्या अंतरंगी डोकावताना या ग्रंथा ला उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार आणि लातूरच्या कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक डॉक्टर दिलीप नागरगोजे यांना प्राचार्य शिवाजीराव भोसले आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या अधिवेशनात महाराष्ट्रसह देश पातळीवरील तत्त्वज्ञान विषयाचे अनेक अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि तत्वज्ञान प्रेमी सहभागी होणार आहेत. अधिवेशन यशस्वी होण्यासाठी स प महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्राध्यापक डॉक्टर सुनील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली चाळीसाव्या अधिवेशनाच्या स्थानिक सचिव डॉक्टर रेखा शेरकर आणि महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेचे अध्यक्ष मा डॉक्टर सुनील दत्त गवरे ,कार्याध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर अमन बगाडे आणि परिषदेचे सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत .

## 'मिशन अयोध्या'ची नवी पोस्ट आणि पोस्टर चर्चेत!

मुंबई : प्रभू श्रीरामांच्या जन्मभूमीतील अयोध्या राम मंदिराशी जोडलेला आणि मराठी प्रेक्षकांच्या हृदयाला भिडणारा प्रख्यात दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे लिखित आणि निर्माते कृष्णा दादाराव शिंदे आणि योगिता कृष्णा शिंदे यांच्या 'आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि.' निर्मित 'मिशन अयोध्या' चित्रपटाचा प्रवास, त्याच्या अत्यंत आकर्षक मोशन पोस्टरमुळे सर्वांचे आकर्षण ठरत असून भक्त आणि चित्रपट रसिकांमध्ये कमालीची उत्सुकता तयार झाली आहे. नुकताच या चित्रपटाचे नवे पोस्टर आणि कॅप्शन चर्चेत आली आहे. पुढच्या पिढयांना आपण कोणता 'राम' शिकवणार आहोत? रावणावर विजय मिळवणारा राम कि रामराज्य प्रत्यक्षात आणणारा आदर्श 'राजाराम'? हे दोन प्रश्र्न या कॅप्शनद्वारे उपस्थित करण्यात आले आहेत. समाजमाध्यमात याविषयी अनेक तर्कवितर्कांसह च्रर्चा सुरु झाल्या आहेत.

भस्मासुरी आगीच्या वावटळीत उभ्या असलेल्या एका पाठमोऱ्या व्यक्तीचा शक्तिशाली प्रतिमाविष्कार, तिच्या हातातील प्रभू श्रीरामांच्या झेंड्याचा तेजस्वी अभिमान आणि पार्श्र्वभूमीवर ऐकू येणारी प्रभू रामांच्या मंत्र – नामाची भक्तिमय धून असे मोशन पोस्टर चित्रपटगृहांसह सामाजिक माध्यमांवर झळकाल्यानंतर या चित्रपटाविषयी कमालीचे आकर्षण तयार झाले आहे. त्यामुळे आता नव्याने झळकलेल्या या फोटो आणि पोस्टमुळे चित्रपटात नेमकं काय पहायला मिळणार आहे? यात कोण कोण, कोणत्या कोणत्या, भूमिकांमध्ये आहेत याविषयीचे कुतूहल कायम आहे....

राममंदिर स्थापनेच्या पहिल्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत, 'मिशन अयोध्या' २३ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्रातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. भक्तिभाव, राष्ट्रभक्ती, आणि मराठी चित्रपटसृष्टीचा अभिमान असलेला हा चित्रपट प्रेक्षकांच्या हृदयावर अधिराज्य करणार आहे.

## १३ वर्षाच्या शाळकरी मुलीवर अत्याचार करुन हत्या, अपहरणाच्या तक्रारीनतर पोलिसांनी घेतला शोध

ठाणे,: भिवंडी–कल्याण सीमेवरील गांधारी पुला नजीकच्या बापगाव या गावातील कब्रस्तान परिसरातील निर्जन स्थळी एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून निर्घृण हत्या झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून घटनेची माहिती मिळताच स्थानिक पडघा पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कल्याण शहरातील कोळसेवाडी पोलीस ठाणे हद्दीतील एक १३ वर्षीय अल्पवयीन शाळकरी मुलगी सोमवारी संध्याकाळी चार वाजता पासून बेपत्ता असल्याने पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंद केला होता. मात्र, मुलीचा शोध घेतला असता तिचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

अपहरण झालेल्या मुलीचा शोध स्थानिक कल्याण पोलीस घेत असतानाच मंगळवारी सकाळी या मुलीचा मृतदेह बापगाव येथील कब्रस्तान नजीकच्या निर्जनस्थळी आढळून आला आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार तिची निर्घृण हत्या करण्यात आली असून, तिच्यावर अत्याचार देखील केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, पोलिसांनी गंभीरपणे तपास सुरू केला आहे.

याप्रकरणी मयत मुलीचे वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार, खाऊ खाण्यासाठी मुलीने आईकडून पैसे घेऊन ती जवळील दुकानावर गेली होती. मात्र, तेव्हापासून ती बेपत्ता होती, तिला शोधण्यासाठी संपूर्ण कुटुंबाने सर्वत्र शोध घेतला. परंतु, ती रात्रीपर्यत काही मिळून आली नाही. त्यानंतर कुटुंबीयांनी ती बेपत्ता असल्याची तक्रार कोळसेवाडी पोलीस ठाण्यात दाखल केली. आज सकाळच्या सुमारास पडघा पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या कल्याण भिवंडी सीमेवरील बाप गावचे हद्दीत या मुलीचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. एकाच परिसरात राहणाऱ्या एका इसमावर मयत मुलीच्या वडिलांनी संशय व्यक्त केला आहे. कारण, या इसमाने जवळपास एक वर्षे आधी याच मुली बरोबर विनयभंग केला होता, तेंव्हा पोक्सो अंतर्गत त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, पुन्हा याच मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याची घटना समोर आल्याने मयत मुलीच्या वडिलांनी संबंधित इसमावर संशय व्यक्त केला आहे. सध्या पोलिसांनी या संपूर्ण घटनेत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## सुमतीताईंनी संघर्षातून निर्माण केलेल्या विश्र्वासार्हतेच्या पायावर यशाचा कळस – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर :– अत्यंत आव्हानात्मक अशा काळात सुमतीताईंनी खूप संघर्ष केला. अनेक लोकआंदोलने केली. त्यांच्या सोबत अनेक घटकातील कार्यकर्त्यांनी संघर्षाची बीजे घेऊन समाजात विश्र्वासार्हता निर्माण केली. ताईंच्या संघर्षाच्या समृद्ध वारशावरच आम्हाला यश प्राप्त करणे शक्य झाले. त्याकाळात ताईंसह अनेक निस्वार्थ कार्यकर्त्यांनी रचलेल्या पायावर आम्हाला कळसापर्यंत पोहोचता आले, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली. सुमतीताई या केवळ लढवय्या ताई नव्हत्या तर त्यांना लोकमाता म्हणून संबोधने अधिक समर्पक असल्याचे त्यांनी सांगितले.




श्रद्धेय सुमतीताई सुकळीकर यांच्या जन्मशताब्दी सांगता समारोहात ते बोलत होते. येथील स्व. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ड. मिराताई खडतकर, कार्यक्रमाचे संयोजक अनिल सोले, माजी प्र–कुलगूरु योगानंद काळे, उपेंद्र कोठेकर, माजी आमदार अरुणभाऊ अडसड, चैनसुख संचेती व मान्यवर उपस्थित होते. याचबरोबर आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार चरणसिंग ठाकूर माजी मंत्री शोभाताई फडणवीस व मान्यवर होते.

भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या काळात ज्या निवडणुका झाल्या त्या सुरुवातीच्या काळात भारतीय जनसंघाला लोकांची सहानुभूती असूनही मोठ्या प्रमाणात गैरसमजही होते. अशा काळात समाजाच्या प्रत्येक घटकात जाऊन त्यांच्यासाठी विविध आंदोलने करण्याची जबाबदारी सुमतीताईंनी समर्थपणे पेलली. सर्वांची मने त्यांनी पुन्हा जुळवली. आपली भूमिका लोकांपर्यंत जावी, आपल्या विचाराचा दीप घरोघरी पोहोचावा यासाठी त्यांनी निवडणुकीत अनेक पराभव सहन करुनही तेथून पळ काढला नाही. शुद्ध भावनेतून त्यांनी ए.बी. बर्धन पासून सर्वांची मने एक ताई म्हणून, आई म्हणून जिंकली. राजकारणातला एक आदर्श वस्तुपाठ सुमतीताईंनी आमच्या पुढे ठेवला आहे, या शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गौरव केला.

माझ्यासाठी त्या आत्याच होत्या. माझे वडील गंगाधरराव व काका बाळासाहेब यांचे हक्काचे घर म्हणजे सुमतीताईंचे घर होते. शोभाताईंनी त्यांच्या बरोबरीने संघर्ष केला. त्यांनी स्थापन केलेल्या बाल जगतच्या माध्यमातून मला घडता आले. नाट्य स्पर्धेच्या माध्यमातून मला लहानपणी पहिल्यांदा दिल्लीला जाता आले. लहान मुलांवर संस्काराच्या जबाबदारीपर्यंत त्यांनी आपली भूमिका समर्थपणे पेलली, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस जुन्या आठवणींना आठवतांना भावूक झाले.

ताईंनी जपलेली विश्र्वासार्हता व समाजात उभी केलेली संघटन शक्ती याचा प्रत्यय १९६२ च्या काळात तेव्हाच्या प्रशासनाने घेतला. युद्धासाठी सुमारे ७०० ते ८०० सैन्यांची तुकडी नागपूर येथून जात असल्याचा निरोप तेव्हाचे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी ताईंना दिला. त्यांच्या जेवणाची व्यवस्था अवघ्या चार तासात करण्याचे आव्हान समोर होते. ताईंना त्यांनी ही जबाबदारी सोपविली. देशप्रेमासाठी सदैव तत्पर असलेल्या ताईंनी ही जबाबदारी समर्थपणे पेलून आपल्या सर्व महिला शक्तीच्या माध्यमातून सगळ्या सैनिकांपर्यंत त्यांनी जेवन पोहोचविल्याच्या घटनेला उजाळा देऊन मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या सूक्ष्म नियोजन शैलीचा गौरव केला.

प्रतिकुल परिस्थितीत लोकसेवेचा दीप ताईंनी तेवत ठेवला – केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नितीन गडकरी

ताईंचा काळ हा संघर्षाचा होता. निवडणुकीत पराभूत व्हायचे, त्याबद्दल दुःख व्यक्त करुन पुन्हा कामाला लागायचे, लोकन्यायाची लढे लढायचे, पुन्हा निवडणूक, पुन्हा पराभव असे सातत्याने वाट्याला येऊनही सुमतीताईंनी जपलेला संघर्षाचा बाणा हा विसरता येणार नाही. त्या लढत राहिल्या. त्यांनी रणांगण सोडले नाही. एखादा नंदादीप तेवत ठेवावा तसे त्यांनी योगदान देऊन आमच्या यशाचा सूकर केला, असे गौरवोद्गार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काढले.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ताईंच्या जीवनकार्याच्या आठवणींना उजाळा दिला. त्या एक झुंझार रणरागीनी होत्या. राजकारणात कुठे थांबावे याचे आदर्श उदाहरण म्हणून त्यांच्याकडे पाहता येईल. त्यांच्या जीवनकार्याचा अंश आम्हाला मिळाला असे त्यांनी सांगितले.

ताईंच्या या जन्मशताब्दी समारोहाच्या निमित्ताने कार्यक्रमास उपस्थित ज्येष्ठ मंडळी, कार्यकर्त्यांचा त्यांनी सन्मान केला. यावेळी सुमतीताई यांच्या जीवनकार्याला अधोरेखित करणाऱ्या विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

## नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत.

पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली.

१९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते.

परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते.

अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

**क्रिसमस ..**

विनंती करे तुज सांता
शहरा हिंडू नकोआता
कधीतरी जा खेड्यात
तिथली वेगळी रे कथा
बळीराजाची अवस्था
जाणून घ्यावीस व्यथा
त्रासलेला तो पोशींदा
वाट पाही येईल त्राता
रंगून गेलला सातबारा
कर्जा दबे बहीखाता
मुक्त करी ऋणातूनि
थकला सहन करता
नवरुपात यावा सांता
होऊन नेता जाणता
हीच वेळ खरोखरीची
उतरावी सारी ऋणता
निसर्ग छळे तयासदैव
उपाशी राही अन्नदाता
राज्य यावे समृध्दीचे
सुखी करी मतदाता
बळीराजा सुखी होता
आनंद लाभेल जगता
आगळा नाताळ सण
धन्य धन्य होशी सांता
बळीराजा स्वता सांता
अन्न दान करी जगता
क्रिसमस खरा साजरा
मनोमनी येशू जागता
२

**पिता सांता ..**

बालपणी नाताळी
घरी यायचा सांता
खेळणी नि मिठाई
ठेवूनि जात होता
आवड त्या माहीत
जादुगारचं जाणता
कळे मज काय हवे
प्रयोग करे कोणता
आश्र्चर्य वाटे केवढे
गालात हसे माता
नंतर कळले सत्य
सांता माता पिता
आयुष्यभर रे सांता
केवळ देतचं होता
देऊन इतुके सगळे
नामा निराळा होता
विसरलो जात धर्मा
मेरीक्रिसमस बोल्ता
समजता येशू गाथा
जीवना ये सफलता
आनंद कळतोआतां
झालो जेधवा पिता
तशीच परंपरा चालू
मुलांस सुख वाटता
वाट पाही नाताळची
वर्ष हे संपता संपता
सुरवात व्हावी छान
नवीन वर्षाची आता

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

## निवृत्तीवेतन धारकांसाठी पेन्शन समाधान उपक्रम

लातूर, : जिल्ह्यातील सर्व राज्यशासकीय निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी लातूर येथील शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन येथे गुरुवार, २६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे. निवृत्तवेतन धारकांनी या अदालतीमध्ये उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील यांनी केले आहे.

## बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक ध्यान धारणा दिवस साजरा

लातुर : नुकताच महाविद्यालयामध्ये जागतिक ध्यान धारणा दिवस साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयामध्ये ध्यान वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. योग शिक्षीका प्रा.सुवर्णा आर्य यांनी सर्व उपस्थितांना ध्यान धारणेबद्दल सखोल माहिती दिली. ध्यान धारणेचे शारीरिक आणि मानसिक फायदेही त्यांनी यावेळी विषद करून सांगितले. तसेच ध्यान धारणा प्रक्रिये बद्दल विस्तृत मार्गदर्शन करुन सर्व उपस्थितांकडुन प्रात्यक्षिक करून घेतले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुरेश हल्लाळी तसेच ईतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने या ध्यान वर्गात सहभाग नोंदवला.

## रामटेक बंगल्याबाबतच्या चर्चे नंतर चंद्रशेखर बावनकुळेंकडून अदलाबदल; पंकजा मुंडे यांचीही तयारी?

मुंबई : मलबार हिलवरील सर्वात प्रशस्त आणि सी–फेसिंग व्ह्यू असलेला बंगला म्हणजे राम टेक बंगला होय. मात्र, याच राम टेक बंगल्याबाबत अनेक घडामोडी घडत असल्याचे समोर आले आहे. मंत्रिमंडळ खातेवाटपानंतर आता मर्त्यांना मंत्रालयातील दालनाचे आणि दालनाच्या पाठोपाठ सरकारी बंगल्यांचेही वाटप करण्यात आले.

# लातुरात दोन दिवसीय मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाचे आयोजन : प्रकाश देशमुख

लातूर : अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्या वतीने येत्या दि. २८ व २९ डिसेंबर २०२४ रोजी लातूर येथील औसा रोडवरील थोरमोटे लॉन्स याठिकाणी मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लातूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपाध्यक्ष प्रकाश देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.




थोरमोटे लॉन्स, औसा रोड लातूर येथे लोकनेते विलासराव देशमुख नगरीत पार पडणाऱ्या या दोन दिवसीय शैक्षणिक संमेलनाचे उद्घाटन शनिवार, दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदाची जबाबदारी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्यावर सोपविण्यात आली आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून प्राचार्य बाबुराव जाधव तर संमेलन कार्याध्यक्ष म्हणून हनुमंत साखरे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. डॉ. शिवाजी काळगे , खा. ओमराजे निंबाळकर, आ. अमित देशमुख, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. संजय बनसोडे, आ. विक्रम काळे, आ.अभिमन्यू पवार, आ. सतीश चव्हाण, आ. रमेशप्पा कराड, माजी आमदार धीरज देशमुख, लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, विभागीय शिक्षण उपसंचालक गणपतराव मोरे, मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शनिवारी दुपारच्या सत्रात दुपारी ३ वाजता नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, आरसीसीचे प्रा. शिवराज मोटेगावकर, यांचे व्याख्यान होणार आहे. तर सायंकाळी चार वाजता मुख्याध्यापक : कर्तव्य व जबाबदाऱ्या या विषयावर व्याख्यान होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अॅकडमिक स्किल कोच श्रीमती वैशाली देशमुख, वसंतराव पाटील, मोहन सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सायंकाळी ५ वाजता अशैक्षणिक कामे आणि शैक्षणिक गुणवत्ता या विषयावरील शोधनिबंध मराठवाडा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ हिंगोली हे सादर करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय शिप्परकर हे राहणार आहेत. रात्री सात ते साडेआठ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम होतील.

रविवार, दि. २९ डिसेंबर रोजी सकाळच्या पहिल्या सत्रात आरटीई ऍक्ट २००९ अंमलबजावणी बाबत विदर्भ मुख्याध्यापक संघ शोध निबंध सादर करतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मारुती खेडेकर हे राहणार आहेत. यावेळी सतीश जगताप, शत्रुघ्न बिडकर यांची प्रमुख उपस्थिती राहील. सकाळी साडेदहा ते साडेअकरा या वेळेत होणाऱ्या व्याख्यान प्रसंगी शिक्षण संचालक तथा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी, शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी, महेश पालकर, राहुल रेखावार , रावसाहेब आवारी आदी मान्यवरांची उपस्थित राहणार आहे. सकाळी साडेअकरा वाजता ’ लातूर पॅटर्न : एक दृष्टीक्षेप ’ या विषयावर प्रा. सतीश पवार यांचे व्याख्यान होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के.एफ. ठोमसे हे राहणार आहेत. यावेळी खंडेराव जगदाळे, दत्तात्रय कदम, एस.बी. जगताप यांची उपस्थिती राहणार आहे. दुपारी बारा वाजता ’ जीवन सुंदर आहे’ या विषयावर सिनेअभिनेत्री निशिगंधा वाड यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारच्या सत्रात खा. डॉ. शिवाजी काळगे , आ. विक्रम काळे यांचा सत्कार केला जाणार असून त्यानंतर खुले अधिवेशन होणार असल्याचे प्रकाश देशमुख यांनी सांगितले. लातूर – धाराशिव जिल्ह्यात दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी होणारी दर्श वेळाअमावास्या यावर्षी दि. ३० डिसेंबर आहे. या पारंपारिक सणाचे विशेष महत्व असे आहे की, या दिवशी भज्जी, आंबील, उंडे, बाजरी – ज्वारीच्या भाकरी, गोड पोळी, गव्हाची खीर, दही – धपाटे असे पंच पक्वानांचा बेत असतो. या संमेलनाच्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व प्रतिनिधींना वेळ अमावास्येच्या आदल्या दिवशी म्हणजे संमेलनाच्या अखेरच्या दिवशी, रविवारी या भोजनाचा आस्वाद घेण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार असल्याचेही प्रकाश देशमुख यांनी सांगितले.

या राज्यस्तरीय संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संयुक्त अध्यक्ष रावसाहेब आवारी, अध्यक्ष के.एस. मसे , कार्याध्यक्ष मोहन सोनवणे , राज्य उपाध्यक्ष नंदकुमार बारवकर, शत्रुघ्न बिरकड, अशोक मोरे, मराठवाडा अध्यक्ष संजय शिप्परकर , उपाध्यक्ष देविदास उमाटे, कांचन महाजन, नामदेव सोनवणे, सचिव जालिंदर पैठणे, विदर्भ अध्यक्ष सतीश जगताप, उपाध्यक्ष मंदा उमाटे, विनोद संगीतराव, सचिव विलास भारसाकळे, लातूर जिल्हा अध्यक्ष प्रकाश देशमुख, सचिव बजरंग चोले , कोषाध्यक्ष शिवराज म्हेत्रे, प्रवक्ते कालिदास शेळके, उपाध्यक्ष रमेश मदरसे, सचिन साबणे, उमेश पाटील, श्रीमती जयश्री ढवळे , मार्गदर्शक दिलीप धुमाळ, धनराज चिद्रे , सुवर्णा जाधव, दत्तात्रय पारवे ,अनिल कारभारी, रामेश्र्वर कदम, बालाजी मुंडे, एस.व्ही. मादलापूरे, परवेजखान पठाण, विशाल पात्रे , जयश्री पाटील आदी परिश्रम घेत आहेत.

# सार्वजनिक विकासासाठी देशमुख परिवार रस्त्यावर ?

लातूर (दैलाप्रप्र) : लातूर शहर व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी झोपडपट्टीतील सोयी सुविधा साठी दलित पँथर, दलित मुक्ती सेना हे अग्रेसर राहून संघर्ष करीत होते, पोलीस ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय असो नगरपालिका असो या ठिकाणी ठाण मांडून जनतेच्या प्रश्र्नासाठी आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते अग्रेसर होते. सत्ताकारण्याच्या बेरजेतून आंबेडकर चळवळीत फटाफट झाली असली तरी ती एक संघ असल्यामुळे कालच्या परभणी, बीड प्रकरणावरून सर्व जनता एकत्र झाली असताना, लातूर मधील आंबेडकरी जनतेने शांततेचा मार्ग स्वीकारल्यामुळे सर्व काही शांत असताना सर्वसामान्याच्या विकासासाठी काँग्रेसने पुढाकार घेतला असल्यामुळे यातील गौडबंगाल काय असावे हेच कळत नाही. अशीच कुजबूज राजकीय वर्तुळात होताना दिसते आहे.

मागील दहा वर्षाच्या काळामध्ये भाजपा मित्र पक्षाची सत्ता होती, त्यावेळी काँग्रेसच्या मदतीमुळे सर्व काही चालत होते. लातूर शहरातही भाजपा, काँग्रेस मुळेच सत्ताकारण चालत होते, आज घडीला काँग्रेसचा बेपत्ता झाल्यामुळे सर्व काही भाजपा, सेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या हाती सत्ता असल्यामुळे एकमेव आमदार अमित देशमुख हे रस्त्यावर येऊन लातूर शहराच्या विकासासाठी त्यांच्या समस्यासाठी पुढे रस्त्यावर येत आहेत. त्यामुळे प्रशासन, सामान्य प्रशासन विभाग आणि सत्ताधारी लोकप्रतिनिधी आणि सर्वसामान्य जनतेमधून आम्ही देशमुख हे आज रस्त्यावर हे अशीच हे आश्र्चर्यकारक प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसत आहे.

विशेषतः गडीवर बसून सर्वसामान्य जनतेसह वृद्ध महिला पुरुषांना चरणस्पर्श करून घेण्यात धन्यता म्हणणारे आम्ही देशमुख हे आज घडीला सरकारी अधिकाऱ्यासमोर नतमस्तक होत असल्यामुळे, लातूर शहरातील सर्वसामान्य जनतेतून आश्र्चर्यकारकरित्या कुजबूज होत असून, त्या संदर्भात उलट सुलट कुजबूज होताना दिसते आहे.

## ओ मोठ्ठ्या ताई, तुमचे जातीवाद, प्रांतवादाचे राजकारण महाराष्ट्र खपवून घेणार नाही; चित्रा वाघ यांचा सुप्रिया सुळेंवर पलटवार

**(पान १ वरुन) :** घालण्याचा नादात मुंबईतील १३ वा कथित बॉम्ब ब्लास्टष्ठ? लिस्ट करायची झाली तर ती वाढत जाईल... मोठ्ठ्या ताई लक्षात ठेवा महाराष्ट्र आमच्या देवाभाऊंच्या सुरक्षित हातात आहे. आता तुमचं जातीवाद आणि प्रांतवादाचे राजकारण महाराष्ट्र खपवून घेणार नाही, कारण जनता जनार्दनाला समजले आहे की, एक है तो सेफ है, असा हल्लाबोल त्यांनी सुप्रिया सुळे यांच्यावर केलाय.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, परभणीतील घटना महाराष्ट्रासाठी अतिशय निंदनीय आहे. अर्थात या ठिकाणी शरद पवार गेल्यानंतर राज्यातील इतर नेते, लोक गेले तोपर्यंत कुणीही त्या ठिकाणी भेट द्यायला गेले नव्हते. मात्र फक्त पोलिसांची बदली करून चालणार नाही. त्यामुळे कोण आहे हे शोधले पाहिजे. बीड आणि परभणीत ज्या घटना झाल्या, त्यावर विश्वास बसत नाही. जे सिनेमात पाहिले ते वास्तव महाराष्ट्रमध्ये पाहायला मिळतंय. आता पुढचा महाराष्ट्र कसा असेल मला भीती वाटते, मला कधीही भीती वाटली नाही पण आता वाटते, असे त्यांनी म्हटले होते. तर देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अपेक्षा आहेत, त्यांनी महाराष्ट्रला न्याय द्यावा, असेही सुप्रिया सुळे यांनी म्हटल

# मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना त्वरित पोलीस संरक्षण देण्यात यावे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांची मागणी

बीड : बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख यांची नुकतीच अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली आहे, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. २३ डिंसेबर रोजी सायंकाळी मस्साजोग येथे जाऊन दिवंगत संतोष देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला. देशमुख कुटुंबीय अजूनही दहशतीखाली आहेत, त्यामुळे त्यांना ताबडतोब पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी, आमदार देशमुख यांनी केली आहे.



अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुलजी गांधी यांच्या सूचनेवरून मराठवाडा, सोलापूर येथील खासदारांसह आम्ही आज मसाजोग येथे देशमुख कुटुंबीयांच्या भेटीसाठी आलो आहे, असे सांगून या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचेही अमित देशमुख यांनी या भेटीनंतर पत्रकारांसबत बोलताना सांगितले. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होईल, गुन्हेगारांना कठोर शिक्षा होण्याच्या दृष्टीने कारवाई केली जाईल, असे आश्र्वासन राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान दिले आहे, असे असले तरी या प्रकरणातील आणखी तीन आरोपींना अटक झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या संदर्भाने लवकरात लवकर कारवाई व्हावी यासाठी आम्ही काँग्रेस पक्षाच्या वतीने सरकारवर दबाव आणणार आहोत असेही त्यांनी यावेळी सांगितले. स्व. संतोष देशमुख यांचे कुटुंबीय अजूनही दहशतीखाली आहेत त्यामुळे त्यांना ताबडतोब पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी आमदार देशमुख यांनी केली.

यावेळी आमदार अमित देशमुख यांच्या समवेत लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, नांदेडचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण जालन्याचे खासदार कल्याण काळे, सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे, दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, बीडचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजेसाहेब देशमुख, बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे, पप्पू कोंडेकर, गणेश एस आर देशमुख, प्रवीण सूर्यवंशी, यशपाल कांबळे, विठ्ठल पावडे, देवराव पंडागळे, केदार साळुंखे, महेश देशमुख आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी देशमुख कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

## सोमनाथ सूर्यवंशीच्या मारेकऱ्यांवर ३०२ चा गुन्हा दाखल करावा : संजयभाऊ कांबळे

लातूर : बहुचर्चित परभणी घटनेतील मयत सोमनाथ



सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच झाला असून त्याच्या शवविच्छेदन अहवालानुसार त्यांच्या मारेकऱ्यांवर ३०२ चा गुन्हा दाखल करावा. त्याचप्रमाणे लोकनेते विजय वाकोडे यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केल्याच्या मानसिक तणावातून त्यांचा मृत्यू झाला आहे. वाकोडे यांच्या मृत्यूसही पोलीसच जबाबदार असल्याचा आरोप भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी मंगळवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केला.

लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संजयभाऊ कांबळे पुढे म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्यानंतर विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्या घरी जाऊन सांत्वन केले आहे. शवविच्छेदन अहवालात त्यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळे झाल्याचा उल्लेख असतानाही अद्यापपर्यंत मारेकऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. तसेच गुन्हा दाखल करण्याबाबत कोणीही पुढाकार घेतलेला नाही. त्यांच्या अंत्यविधीच्या दिवशी आंबेडकरी समाजाची गुन्हा दाखल करण्याची संतापजनक मागणी होती. परंतु संतापलेल्या समाजाला एड. बाळासाहेब आंबेडकर यांनी शांत राहण्याचे आवाहन केल्यामुळे आंबेडकरी समाज शांत राहिला. ही संधी पोलिसांना मिळाल्याने त्यांनी चक्क सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू श्र्वसनाच्या आजारामुळे झाल्याचा अहवाल तयार करून मुख्यमंत्र्यांकडे पाठविला. तो अहवाल विधिमंडळात वाचून दाखवून मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करणार असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणात विरोधी पक्ष, विविध राजकीय पक्षाचे नेते सांत्वनपर भेटी देऊन प्रकरणाचे राजकारण केले जात असल्याबद्दल कांबळे यांनी तीव्र शब्दात संताप व्यक्त केला.

सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या अमानुष मारहाणीमुळेच झाला असल्याने त्यांच्या मारेकऱ्यांवर तात्काळ ३०२ चा गुन्हा दाखल करावा आणि त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून द्यावा. तसेच लोकनेते विजय वाकोडे यांच्यावर सुद्धा पोलिसांनी दंगलीचा खोटा गुन्हा दाखल केल्याने त्या मानसिक तणावातच त्यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या मृत्यूलाही पोलिसच जबाबदार आहेत. याबाबतही गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी आपली मागणी आहे. सध्या राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे गोरगरीब जनतेमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दुसरीकडे राज्यातील अंबाजोगाई, नांदेड, पुणेसह ११ जिल्ह्यांमध्ये बनावट औषधांचा पुरवठा ठेकेदारांमार्फत झाला असून सदर बनावट औषधांमुळे किती रुग्णांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे, याची भीती जनमानसात आहे. या प्रकरणाचीही सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही भारतीय दलित पँथरच्या वतीने करण्यात येत असल्याचे संजयभाऊ कांबळे यांनी सांगितले. केवळ पोलीस प्रशासनच नव्हे तर न्याय व्यवस्थेशी संबंधित असणारे न्यायाधीशही आता न्याय देण्यासाठी लाचेची मागणी करत असल्याचे सातारा येथील घटनेवरून दिसून आले. त्यामुळे सामान्यांनी आता दाद मागायची तरी कोणाकडे ? असा गंभीर सवालही संजयभाऊ कांबळे यांनी उपस्थित केला. याप्रसंगी नामदेव बामणे, निवृत्ती भाटकुळे, धम्मानंद घोडके, संग्राम कदम, सतीश वाघमारे, नारायण गायकवाड, सतीश मादळे, गोविंद गायकवाड, राजीव कांबळे, इतिहास कांबळे, महेंद्र आचार्य, धम्मपाल सावंत,उत्तम कांबळे, हरिश्र्चन्द्र वाघमारे, सत्यवान जोगदंड, कैलास क्षीरसागर, विशाल कांबळे आदींची उपस्थिती होती.

## ‘सहकार से समृद्धी’ अंतर्गत विशेष कार्यक्रमाचे २५ डिसेंबर रोजी आयोजन

लातूर, : पतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून ‘सहकार से समृध्दी’ अंतर्गत बहुद्देशीय प्राथमिक सहकारी संस्था, दुग्धव्यवसाय व मत्स्यपालन सहकारी संस्था स्थापन करून सर्व ग्रामपंचायत व गावांना समाविष्ट करण्याची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत एकूण दहा हजार प्राथमिक सहकारी संस्था स्थापन झाल्या असून त्यापैकी सहा हजार संस्था दुग्ध व्यवसायाशी निगडीत आहेत. ही उपलब्धी साजरी करण्यासाठी २५ डिसेंबर रोजी नवी दिल्ली येथील आयसीईआर कन्व्हेंशन सेंटर येथे विशेष समारंभ होत आहे. या अनुषंगाने लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील डीपीडीसी सभागृहात २५ डिसेंबर रोजी दुपारी १.३० ते सायंकाळी ५ दरम्यान विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यावेळी उपस्थित राहणार आहेत.

स्थानिक खासदार, आमदार यांच्यासह सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे, स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, जेडब्ल्यूसीचे सभासद, स्थानिक प्राथमिक सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सचिव, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे पदाधिकारी, पीएसीएसचे सचिव, संचालक मंडळ, दुग्ध उत्पादक सहकारी संस्था आणि मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांचे, संघाचे प्रतिनिधी आणि संचालक या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी पदाधिकारी, नागरीकांच्या घेतल्या भेट

लातूर प्रतिनिधी : लातूर शहर व जिल्ह्यातून आलेले नागरिक, विविध संघटना, संस्थांचे पदाधिकारी यांची राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार दि. २४ डिंसेबर रोजी बाभळगाव निवासस्थानी भेट घेतली. त्यांच्या समस्या, अडचणी समजून घेतल्या त्या सोडवण्यासंदर्भात संबंधितांना सूचना केल्या आहेत.



आमदार देशमुख यांनी नागरिकांच्या निवेदणे स्विकारली आणि त्यांच्या निराकरनासाठी आवश्यक ती पाऊले उचलण्याचे आश्र्वासन दिले. त्यांनी संबंधितांना त्वरित निराकरण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# तिरंगा — भारताचा मानबिंदू

देशात आज स्वातंर्त्यदिन साजरा होत असताना पंतप्रधान मोदींनी प्रथेप्रमाणे भारताचा तिरंगा लाल किल्ल्यावर फडकावून देशवासियांना संदेश दिला. देशात सर्वत्र स्वातंर्त्यदिन आनंदात साजरा केला जात आहे. मात्र भारताची आन, शान आणि भारताचा मानबिंदू असलेला आपला राष्ट्रध्वज – तिरंगा याच्यविषयी आपल्याला बरेचवेळा फारच कमी माहिती असते. आजच्या स्वातंर्त्यदिनाचे औचित्य राखून आपल्या तिरंग्याविषयी जाणून घेणे योग्य ठरेल.



दीर्घकाळ स्वातंर्त्याचा लढा दिल्यानंतर आणि लक्षावधी हुतात्म्यांनी देशासाठी देहाची आहुती दिल्यानंतर स्वतंत्र भारतासाठी राष्ट्रध्वज ठरविला गेला तो दिवस होता २२ जुलै १९४७. मछलीपट्टणमच्या पिंगली वैकय्या यांनी हा ध्वज तयार केला मात्र प्रथम तो तीन रंगात नव्हता. राष्ट्रपिता म.गांधींनी त्यात सुचविलेल्या बदलाप्रमाणे नंतर तो तिरंगी करण्यात आला. घटना समितीच्या बैठकीत पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी त्यासंदर्भातला ठराव मांडला होता. भगवा, पांढरा, हिरवा आणि मधोमध निळ्या रंगाचे अशोकचक्र असलेला हा ध्वज फार विचार करून बनविला गेला आहे. ध्वजाचा प्रत्येक रंग आणि अशोकचक्र ही विशिष्ठ गुणांची द्योतक आहेत.

भगवा किंवा केशरी हे त्याग आणि धैर्याचे प्रतीक आहे. पांढरा प्रकाश, शांती आणि सत्याची भावना व्यक्त करणारा तर हिरवा समृद्धी आणि निसगाचे भूमीशी असलेले नाते व्यक्त करणारा रंग. मधले निळे अशोकचक्र हे सागराची अथांगता आणि कालचक्राचे द्योतक आहे. हे अशोकचक्र म्हणजे जगाला विश्वशांतीचा संदेश देणारे बौद्ध धर्माचे प्रतीक असलेले धम्मचक्र आहे.

देशाची अस्मिता दर्शविणारा हा राष्ट्रीय ध्वज कसा असावा, कसा वापरावा आणि कधी वापरावा याचे नियम भारतीय घटनेने घालून दिलेले आहेत. हा ध्वज खादी, रेशमी अथवा लोकरी कापडापासून बनविला जावा तसेच त्याची लांबी रूंदी ३ : २ अशा प्रमाणात असावी. ध्वज फडविताना तो सगळ्यांना दिसेल अशा सन्मानपूर्वक उच्च स्थानावरून फडकविला जावा. शासकीय इमारतींवर कोणत्याही हवामानात तो सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यत फडकत राहावा व सूर्यास्तानंतर उतरविताना बिगूल वाजवून अगदी हळूहळू आदरपूर्वक उतरविला जावा. केवळ प्रजासत्ताक दिन आणि स्वातंर्त्यदिनादिवशीच तो फुलांच्या पाकळ्या ठेवून फडकविला जातो.

भारताला स्वातंर्त्य मिळाले १५ ऑगस्ट १९४७ रोजी. मात्र स्वतंत्र भारताचा पहिला तिरंगा फडकला तो १६ ऑगस्ट रोजी. जगातील सर्वोच्च शिखर माऊंट एव्हरेस्टवर तिरंगा प्रथम फडकला तो २९ मे १९५३ रोजी. तर १९८४ मध्ये भारतीय ध्वज अंतराळात नेला गेला तो विंग कमांडर राकेश शर्मा यांच्या अंतराळतील स्पेस सूटबरोबर.

पहिला भारतीय ध्वज १९०४ साली बनविला गेला होता मात्र तो तिरंगा नव्हता. स्वामी विवेकानंदाच्या आयरिश शिष्या भगिनी निवेदिता यांनी हा लाल पिवळ्या रंगाचा ध्वज फडकाविला होता व नंतर तो निवेदिता ध्वज याच नावाने ओळखला जाऊ लागला. २२ ऑगस्ट १९०७ साली मॅडम भिकाजी कामा यांनी जर्मनीच्या भूमीवर प्रथम भारतीय ध्वज फडकाविला मात्र हाही आत्ताचा तिरंगा नव्हता असे इतिहास सांगतो.

पंतप्रधान, राष्ट्रपती, उपपंतप्रधान, उपराष्ट्रपती यांच्या निधनानंतर राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविला जातो तसेच मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, गव्हर्नर, ले.गव्हर्नर, केंद्रीय मंत्री, सभापती, मुख्य न्यायाधीश, यांच्या निधनानंतर ते ज्या राज्याचे प्रतिनिधित्व करतात त्या राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविला जातो. मात्र याच काळात १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी असेल तर तो अर्ध्यावर उतरविला जात नाही. पंतप्रधान, राष्ट्रपती, लष्करातील शहीद अशा कांही मान्यवरांच्या अंत्यसंस्कारावेळी त्यांचा देह तिरंग्यातून लपेटून नेला जातो मात्र अंत्यसंस्कारापूर्वी ध्वज अतिशय सन्मानाने काढून घेतला जातो.

आपल्या राष्ट्रध्वजाचा मान सर्व भारतीयांनी ठेवला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रध्वजाचा अपमान होणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे. राष्ट्रध्वज कधीही फाटलेला, मळलेला असू नये तसेच तो कुठेही कसाही फेकलेलाही असू नये आणि याची शिकवण बालपणापासूनच मुलांमध्ये रूजविली जाईल याची दक्षता घेतली गेली पाहिजे तरच आपली भावी पिढी राष्ट्रध्वज आणि पर्यायाने देशाची मान ताठ ठेवण्यास जागरूक राहु शकेल.

## राशीभविष्य २५ डिसेंबर २०२४

मेष : शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण
संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

वृषभ : शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : उत्तर
एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल.

मिथुन : शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण
मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

कर्क : शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

सिंह : शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर
एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

कन्या : शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम
कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल.

तुळ : शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर
आपल्या भोळ्या स्वभावाचा इतर गैरफायदा तर घेत नाही ना याकडे लक्ष द्या.

वृश्चिक : शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व
मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल. विचार बदलतील.

धनु : शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

मकर : शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील.

कुंभ : शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण
एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल.

मीन : शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम
मुलांच्या बाबतीत कठोर निर्णय घ्यावे लागतील. अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे ठरेल.

## उष्माघात आणि गर्मीपासून वाचण्यासाठी खा या थंड करणाऱ्या गोष्टी, शरीर राहील थंड

जोरदार उष्ण वारे आणि कडक उन्हामुळे उन्हाळ्यात घराबाहेर पडणे कठीण होते. पण या मोसमात अशा टिप्स फॉलो करणे खूप गरजेचे आहे, ज्यामुळे तुम्ही स्वत:ला उष्णतेपासून वाचवू शकता. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी शरीराला थंड ठेवणाऱ्या आरोग्यदायी गोष्टी खा. ज्या गोष्टी तुमच्या शरीराला हायड्रेट ठेवतात. वाढत्या तापमानात शरीराला थंड ठेवता येते.



हे तुम्हाला दिवसभर उत्साही राहण्यास देखील मदत करेल. उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी तुम्ही कोणत्या पदार्थांचा आहारात समावेश करू शकता ते आम्ही तुम्हाला सांगतो.

काकडी

उन्हाळ्यात काकडी जरूर खावी. यामुळे तुमचे शरीर थंड राहते. ही काकडी आरोग्यासाठी सर्वोत्तम पदार्थांपैकी एक आहे. काकडीत पाण्याचे प्रमाण जास्त असते. त्यात व्हिटॅमिन ए आणि बी असते. त्यात इतर अनेक पोषक घटक असतात. यामध्ये कॅलरीज खूप कमी असतात. यासोबतच ते शरीराला थंड आणि हायड्रेट ठेवण्याचे काम करते. याशिवाय या ऋतूत टरबूज सारखी स्वादिष्ट फळे खाणे देखील आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

टोमॅटो

टोमॅटो उष्णता मारतो. हे खूप हायड्रेटिंग आहे. टोमॅटोमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात. त्यात व्हिटॅमिन सी असते. हे सूज येण्यापासून प्रतिबंधित करते. टोमॅटो सहसा करीमध्ये समाविष्ट केले जातात.

दही

दह्यासोबत रायता, ताक आणि लस्सीसारखे पेय तयार करू शकता. दही हे प्रोबायोटिक आहे. त्यामुळे आतडे निरोगी राहण्यास मदत होते. याचे सेवन केल्याने शरीर थंड राहण्यास मदत होते.

नारळ पाणी

उष्माघात टाळण्यासाठी तुम्ही नारळ पाणी पिऊ शकता. त्यात इलेक्ट्रोलाइट असते. उन्हाळ्यामुळे त्रासलेल्या लोकांनी नारळपाणी जरूर प्यावे. नारळाच्या पाण्याने तुम्ही शरीराला थंड ठेवू शकता. यामुळे शरीरातील सोडियम आणि पोटॅशियमचे संतुलन राखण्यास मदत होते.

पुदीना

पुदिन्याची पाने चटणीसाठी लोकप्रिय आहेत. पुदिन्याचे पाणीही पिऊ शकता. या पानांमध्ये अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात. पुदिन्याची पाने रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

## (गुरु वचन),मजबूत मन हेच सामर्थ्य

एखाद्या शास्त्रीय नर्तिकेचा अपघातात एक पाय निकामी होऊनही तिची नृत्याची जिद्द कमी होत नाही. ती नकली पाय बसवून व्यासपीठावर नाचते. एखाद्या क्रिकेटपटूने चांगला खेळ केला तरीही त्याला संघाबाहेर जाण्याचा रस्ता दाखविला जातो. परंतु, तो हार न मानता पुन्हा संघात दाखल होतो. एका महान चित्रपट निर्मात्याच्या महत्त्वाकांक्षी चित्रपटाला दर्शकांनी नकार दिल्यानंतर तो पुन्हा एक चित्रपट निर्माण करतो आणि तो चित्रपट इतिहास घडवितो किंवा मैलाचा दगड ठरतो.

असे नेहमीच होते. कारण जगात दोन प्रकारचे लोक असतात. एक म्हणचे कमजोर मनाचे आणि दुसरे म्हणजे मजबूत मन असलेले. कमजोर मन असणाऱ्या लोकांमध्ये संकटाचा सामना करण्याचे धाडस नसते. त्यामुळे ते अधिकधिक कमजोर होऊन तक्रार करणे, रडणे यामुळे अयशस्वी होतात. मात्र आपल्या अपयशाचे खापर दुसऱ्याच्या माथ्यावर फोडण्यासाठी कारणे शोधतात.

मजबूत मन असणारे लोक असे नसतात. ते प्रत्येक संकटाचा धैर्याने सामना करतात. टीकाकारांनी केलेली टीका त्यांचे मन बदलू शकत नाही. ते आपली हिंमत गमावत नाहीत, ते तक्रार करत नाहीत. ते प्रत्येक घटनेचा सकारात्मक बाजूने विचार करून एक दिवस यशस्वी होतात. कारण, त्यांच्यामध्ये संकटाच्याकाळी आत्मविश्वास आणि महत्त्वाकांक्षा असते. ते जीवनातील प्रत्येक आव्हानाचा अधिकाधिक फायदा घेण्याचा प्रयत्न करत असतात.

आपण यापैकी कसे आहात आणि कसे बनू इच्छिता, ते ठरविण्याचा अधिकार आपल्याला आहे. कारण, जीवनात प्रत्येकाला एक प्रश्न विचारला जातो तो म्हणजे, आपण साहसी बनू इच्छिता की भित्रे? सकारात्मक विचार करणारा कधीच भित्रा बनू शकत नाही. कारण, त्याचा स्वत:वर, जीवनावर आणि ईश्वरावर विश्वास असतो. ते उच्च विचारशक्ती आणि आत्मविश्वासाने आपले काम करतात. असे लोक आपल्यासाठी काम करतातच पण त्यांच्यामुळे देश आणि समाजाची प्रगती होत असते. असेच लोक देश आणि समाजाची अनमोल संपत्ती असतात. म्हणून नेहमी आपले मन मजबूत ठेवा. कारण, ए. पी. जे. अब्दुल कलाम, धीरूभाई अंबानी, अमिताभ बच्चन आणि सचिन तेंडूलकर या महान लोकांनी जन्म घेतला नसता तर एवढे मोठे कर्म त्याच्या हातून झाले नसते.

## इतिहासात आजचा दिवस २५ डिसेंबर २०२४

अंतरराष्ट्रीय

०००१ – कॅलेंडर निर्माते डिओनसेस एक्सीगझ यांचा कॅलेंडर अनुसार पहिला ख्रिसमस साजरा करण्यात आला.

०५९७ – इंग्लंडने जुलियन कॅलेंडरची पद्धत स्विकारली.

१८३१– लुईसियाना आणि अरकनसस ख्रिसमसनिमित्त सुट्टी देणारे पहिले राज्य बनले.

१८३२ – चार्ल्स डार्वीन यांनी कॅप रिसेवरच्या सेंट मार्टीन येथे ख्रिसमस साजरा केले.

राष्ट्रीय

१९६९ – मद्रास येथे ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या सामन्यात भारताने सर्वबाद १६३ धावा केल्या. या सामन्यात ॲशले मॅलेटने ९१ धावात ५ गडी बाद केले.

१९७२ – दिल्ली येथे पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने भारताला ६ गड्यांनी हरविले.

जन्म

१८७६ – कायदे आजम मोहम्मद अली जिन्ना यांचा जन्म.

१९१२ – न्यूझीलंडचा क्रिकेपटू डोनाल्ड मॅकरे याचा जन्म.

१९१८ – मिस्त्रचे राष्ट्रपती अनवर अल सादात यांचा जन्म.

१९२४ – भाजपाचे वरिष्ठ नेते व माजी भारतीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म.

१९३६ – निर्माता इस्माईल मर्चंट यांचा जन्म.

१९५६ – पाकिस्तानचा क्रिकेपटू मन्सूर अख्तर याचा जन्म.

निधन

१५३० – मुगल बादशाह बाबर यांचे निधन.

१९७७ – अभिनेता चार्ली चॅपलन यांचे निधन.

१९९१ – पाकिस्तानचा क्रिकेपटू महमूद हुसेन यांचे निधन.

१९९४ – राष्ट्रपती झेल सिंग यांचे निधन.

२००७ – प्रसिद्ध हॉलीवुड नृत्य दिग्दर्शक माइकल किड यांचे निधन.

२००७ – राष्ट्रपीता महात्मा गांधी यांच्या अंत्ययात्रेचा थेट वृत्तांत ऐकविणारे प्रसिद्ध रेडिओ पत्रकार शिव कुमार त्रिपाठी यांचे निधन.

## उपदेशकथा, निर्भय

भावाची प्रकृती बिघडल्याचा निरोप गणपतला मिळाला तेव्हा तिन्हीसांजा उलटून गेल्या होत्या. त्या काळी विजेचे दिवे नव्हते. गणपत कंदिल घेऊन गावी निघाला. गावाची वाट जंगलातून जाणारी होती. सभोवताली किर्रर काळोख पसरला होता. त्यामुळे वातावरण जास्तच भीषण झाले होते. रस्ता निर्मनुष्य. इतक्यात एक झाडाची फांदी पडली. गणपत घाबरला आणि एका झाडावर आदळला. त्यामुळे कंदिल पडला आणि फुटला. घाबरत गणपत उठला. त्याला चालण्याची चाहूल लागली. गणपतला वाटले भूतच आहे. त्यामुळे तो किंचाळला. किंचाळलेला आवाज ऐकून चालणारा माणूस पुढे आला पण तो पांगळा होता. त्याच्या कुबड्यांचा तो आवाज होता, ते काही भूत नव्हते. त्या पांगळ्याने गणपतला विचारले, एवढ्या अंधारात कुठे निघालात? गणपतला हा आवाज एका माणसाचा आहे हे कळले आणि तो एकदम शांत झाला. त्याची भीतीच पळाली. तो निर्भय झाला आणि त्याने पांगळ्याचा हात हातात घेतला आणि चालू लागला. परमेश्वराच्या रूपाने तो पांगळा गणपतला भेटला. कारण त्याचा पांगळेपणा गणपतला जाणवलाच नाही. उलट त्याचा भरभक्कम अंधारच वाटला. म्हणून परमेश्वर सतत सांगाती असतो ही भावना मनात रुजवली की कायम त्याची साथ मिळेल आणि आपण निर्भय बनू.

कथा उपदेश : निर्भय बनवून परिस्थीचा सामना करा.

## ''भुजबळ फडणवीसांना भेटतात, पण अजित पवार भुजबळांना भेटत नाहीत,

मुंबई : राज्यात महायुतीचं सरकार स्थापन होऊन आज जवळपास २० दिवस झाले आहेत. मात्र, तरीही महायुतीमधील काही नेत्यांमध्ये अद्यापही रुसवे-फुगवे सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. कारण महायुती सरकारच्या मंत्रिमंडळातून अनेक दिग्गज नेत्यांना डावलण्यात आलं आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे छगन भुजबळ नाराज असून त्यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली. एवढंच नाही तर मंत्रिपद न मिळाल्यानंतर छगन भुजबळांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत नाराजीही व्यक्त केली. त्यानंतर जहाँ नहीं चैना, वहा नहीं रहना, असं सूचक विधानही भुजबळांनी केलं होतं. त्यामुळे छगन भुजबळ हे काही मोठा निर्णय घेतात का? याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत.

अशातच छगन भुजबळ यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेत तब्बल अर्धा तास चर्चा केली. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. या भेटीत काय चर्चा झाली? काही राजकीय चर्चा झाली का? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्या भेटीवर राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया येत आहेत. आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी भुजबळांच्या नाराजीवर भाष्य करत काही सवाल उपस्थित केले आहेत. ''भुजबळ फडणवीसांना भेटायला जातात, पण अजित पवार भुजबळांना भेटत नाहीत, याचा अर्थ काय?'', असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केला आहे.

''छगन भुजबळ हे अजित पवार यांच्यावर नाराज आहेत. मग भुजबळ हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटतात. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार हे छगन भुजबळ यांना भेटत नाहीत. मग यामधून राजकीय अर्थ काय घ्यायचा? आता मागच्या काही काळात असं म्हटलं जात होतं की, देवेंद्र फडणवीस यांनीच छगन भुजबळ यांना आंदोलने करायला लावले. आता ते सत्य होते, हे समोर येत आहे. न जाणो, छगन भुजबळ आणखी काही पावले उचलतील. असे एका दिवसांत कोणती पावलं उचलता येत नसतात. त्यासाठी थोडे थांबावे लागते. आणखी ८ दिवस, १० दिवस किंवा एक महिना. सर्व गोष्टी एका क्षणात स्पष्ट होत नसतात?'', असे सूचक भाष्य अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केले.

छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी भेट घेतली. त्या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. तसेच याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारण्यात आला असता अजित पवार म्हणाले की, ''आमचा हा पक्षांतर्गतला प्रश्न आहे. आम्ही आमच्या पद्धतीने सोडवू'', अशी एका वाक्यात प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली होती.

## अपघातांची मालिका थांबेना; मद्यधुंद कार चालकाने ९ जणाना उडवले, ४ जण गंभीर जखमी

ठाणे,: उल्हासनगर येथील कॅम्प नंबर चारच्या व्हीनस चौकात आज (२४ डिसेंबर) पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. एका मद्यधुंद कारचालकानं ९ जणांना धडक दिली. या घटनेत ४ जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कार चालक व्हीनस चौक परिसरातून कार भरधाव वेगानं घेऊन जात असताना त्यानं रस्त्यावरून जाणाऱ्या रिक्षा आणि काही नागरिकांना जोरदार धडक दिली. कारचालक मद्यधुंद अवस्थेत असल्यानं हा अपघात झाल्याची माहिती अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीनं दिली. यातील दोघांवर खासगी तर इतर दोघांवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात इतका भीषण होता की, कारचा अक्षरश: चक्काचूर झाला आहे. या अपघातात कार चालकासह ४ जण गंभीरित्या जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आता याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

पुण्यात डंपर चालकानं फूटपाथवर झोपलेल्या ९ जणांना चिरडले : दारूच्या नशेत गाडी चालवून तळीराम स्वत:सहीत इतरांचाही जीव धोक्यात घालत आहेत. पुण्यातील वाघोली परिसरात केसनांद फाट्याजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या डंपर चालकाने फूटपाथवर झोपलेल्या ९ जणांना धडक दिल्याची घटना सोमवारी (२३ डिसेंबर ) घडली होती. दारूच्या नशेत असलेल्या डंपर चालकानं हे कृत्य केल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती.

## सबसे कातील गौतमी पाटीलची स्टार प्रवाहवर एन्ट्री, दमदार लावणीने जिंकणार प्रेक्षकांची मने

मुंबई,दर्जेदार मालिका आणि नवनव्या रिॲलिटी शोजच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करणाऱ्या स्टार प्रवाह वाहिनीचा लोकप्रिय कार्यक्रम 'आता होऊ दे धिंगाणा' लवकरच १०० भाग पूर्ण करणार आहे. याच निमित्ताने सबसे कातील गौतमी पाटीलची एन्ट्री होणार आहे. तिच्यासोबतच धनंजय पोवारआणि कोकण हार्टेड गर्ल अंकिता प्रभू वालावलकर सामील होणार आहे.



पहिल्या पर्वापासून आता होऊ दे धिंगाणाला प्रेक्षकांचे भरभरुन प्रेम मिळत आहे. सर्वांचा लाडका होस्ट आणि दोस्त सिद्धार्थ जाधवचं खुमासदार सूत्रसंचालन आणि प्रवाह परिवाराचा सळसळता उत्साह हे या कार्यक्रमाचं खऱ्या अर्थाने वेगळेपण. शंभराव्या या प्रवासात या कार्यक्रमाने प्रेक्षकांना खळखळून हसवलं. मनोरंजनाचा हा प्रवास असाच अखंड रहाणार आहे. शंभराव्या भागाच्या खास सेलिब्रेशनमध्ये प्रवाह परिवारासोबतच गौतमी पाटील, धनंजय पोवार आणि कोकण हार्टेड गर्ल अंकिता प्रभू वालावलकर देखिल सामील होणार आहेत.

महाराष्ट्राला लाडका होस्ट आणि दोस्त सिद्धार्थ जाधव या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुन्हा एकदा धिंगाणा घालण्यासाठी सज्जा झाला . या तिसऱ्या पर्वावरही प्रेक्षक भरभरुन प्रेम करु लागलं. मागच्या पर्वात सुपरहिट ठरलेल्या साडे माडे शिंतोडे, बोबडी वळाली, धुऊन टाक, रेखाटा पटा पटा या फेऱ्या या पर्वातही आहेत. त्याचसोबत गरागरा आणि भराभरा, डब्बा डब्बा उई उई, स्मायली काय गायली अश्या अतरंगी फेऱ्या देखील या पर्वात आहेत.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894